ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १५१ वा | दिनांक : ११/०३/२०२५ | वार : मंगळवार

## १० हजार वर्षांतील सर्वात बोगस बजेट



**मुंबई :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी महायुती सरकारने सादर केलेला आजचा अर्थसंकल्प मागील १० हजार वर्षांतील सर्वात बोगस असल्याची टीका केली आहे. आजचा अर्थसंकल्प पाहून मला आचार्य अत्रे यांची आठवण झाली. आज ते असते तर असा बोगस अर्थसंकल्प मी मागच्या १० हजार वर्षांत पाहिला नाही असे ते म्हणाले असते. उद्याचा सूर्य उगवेल, सर्वांना प्रकाश मिळेल व त्यातून व्हिटॅमिन बी सुद्धा मिळेल अशा आशयाचे हे बजेटचे आहे. 'मारल्या होत्या थापा भारी आणि महाराष्ट्र केलाय कर्जबाजारी', असे ते म्हणालेत.

अजित पवार यांनी आज राज्याचा अर्थसंकल्प सादर केला. त्यावर आता विविध राजकीय नेत्यांकडून संमिश्र प्रतिक्रिया येत आहेत. उद्धव ठाकरे यांनी येथे आयोजित एका पत्रकार परिषदेत बोलताना यंदाचा अर्थसंकल्प मागील १० हजार वर्षांतील सर्वात बोगस असल्याची टीका केली. ते म्हणाले, दरवर्षीसारखा यंदाही अर्थसंकल्प सादर झाला. हा अर्थसंकल्प पाहून मला आचार्य अत्रे यांची आठवण झाली. आज अत्रे असते तर असा बोगस अर्थसंकल्प मी मागच्या १० हजार वर्षांत मी पाहिला नाही असे म्हणाले असते. मी सभागृहात बसून हा अर्थसंकल्प समजून घेण्याचा प्रयत्न केला. त्याचा सार काढायचा झाला तर मी असे म्हणेन की, उद्याचा सूर्य उगवणार आहे. सर्वांना प्रकाश मिळणार आहे. आणि त्यातून व्हिटॅमिन बी सुद्धा तुम्हाला मिळेल, अशा आशयाचा हा अर्थसंकल्प आहे.

विधानसभा निवडणुकीच्या काळात वारेमाप जाहिराती देण्यात आल्या होत्या. त्यापैकी एक जाहिरात मी येथे आणली आहे. या जाहिरातीतील शेवटची ओळ बदलून 'मारल्या होत्या थापा भारी आणि महाराष्ट्र केलाय कर्जबाजारी' अशी केली पाहिजे. सरकारने ही ओळ घेऊन यापुढे पुढे गेले पाहिजे. आम्ही थापा मारून थांबणार नाही हेच आता त्यांचे घोषवाक्य झाले आहे. ज्या गोष्टी त्यांनी यात सांगितल्या आणि मते मिळवली. पण या सरकारला प्रचंड बहुमत मिळाले आहे. त्यांनी मतदारांना ज्या १० थापा मारल्या होत्या. त्यातील एकही गोष्ट सरकारने पूर्ण केली नाही.

उद्धव ठाकरे म्हणाले, महायुती सरकारने लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्याची हमी दिली होती. पण त्यावर या बजेटमध्ये काहीही नाही. शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याच्या आश्वासनावरहीही यात काही नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कारण नसताना माझे नाव भाषणात घेतले. स्थगिती द्यायला मी काही उद्धव ठाकरे नाही असे ते म्हणाले होते. त्यावर मी त्यांना सांगितले होते की, तुम्हाला उद्धव ठाकरे होता येणार नाही. कारण, उद्धव ठाकरे व्हायचे असेल तर दिलेली आश्वासने पूर्ण करावी लागतात. माझ्या नेतृत्वातील सरकारने नागपूर येथे शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यासाठी एक कालबद्ध कार्यक्रम जारी केला होता. त्या धर्तीवर मी मुख्यमंत्र्यांना या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्याचे आव्हान दिले होते.

आजच्या अर्थसंकल्पात सर्वसामान्य जनतेसाठी काहीही नाही. पण कंत्राटदारांसाठी खूपकाही आहे. मुंबईमध्ये ६४ हजार ७८३ कोटींची कामे होणार आहेत. ही कामे सामान्यांची नव्हे तर कंत्राटदारांच्या विकासाची आहेत. सरकारने दोन विमानतळे मेट्रोने जोडण्याचा निर्णय घेतला आहे. हे काम अदानीचे आहे. कारण, विमानतळ अदानींना दिले असेल तर ते काम सरकारने नव्हे तर अदानींनी केले पाहिजे. हे सरकार अदानींना विमानतळाची जागा दिल्यामुळे आम्ही त्यावर रनवेही बांधून देऊ असे म्हणण्यासही मागेपुढे पाहणार नाही. हे सरकार केवळ आपल्या मालकाच्या मित्राच्या हिताचे करत आहे. सरकार विकासाच्या नावाखाली महाराष्ट्र खड्ड्यात घालण्याचे काम करत आहे.

सरकारने अर्थसंकल्पात पूर्वीपासून सुरू असलेली अर्ध्याहून अधिक कामे सांगितली आहेत. त्यात काहीच नवीन नाही. हा अर्थसंकल्प उद्या करू, परवा करू, नंतर करू अशा पद्धतीचा आहे. हा अत्यंत बोगस अर्थसंकल्प आहे. असा अर्थसंकल्प मागच्या अनेक वर्षांत मांडला गेला नसेल, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

## मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्या वक्तव्याचे आ. जितेंद्र आव्हाड यांच्याकडून कौतुक





**मुंबई :** मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी पक्षाच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित मेळाव्यात महाकुंभातील पवित्र स्नानाची खिल्ली उडवली होती. अरे हाड, कोण पिणार ते गंगेचे पाणी, असे विधान राज ठाकरे यांनी केले होते. त्यांच्या या विधानावर प्रतिक्रिया देताना शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी बगला घासत राज ठाकरे यांची नक्कल केली. तसेच त्यांच्या त्या विधानाचे कौतुक करत त्यांच्या डेअरींगला सलामही ठोकला.

राज ठाकरे यांनी महाकुंभातील स्नानावर भाष्य केल्यानंतर त्यांच्यावर टीकेची झोड उठली आहे. राज ठाकरे यांनी हिंदुंच्या भावना दुखावल्या, असे समाजातील लोकांचे म्हणणे आहे. त्यांच्या या विधानावर विविध राजकीय, अराजकीय नेत्यांच्या प्रतिक्रिया येत असून राज ठाकरे हे टीकेचे धनी झाले आहेत. अशात जितेंद्र आव्हाड यांनी राज ठाकरेंचे समर्थन केले आहे. शिवाय त्यांनी डेअरिंग दाखवत महाकुंभावर भाष्य केल्यामुळे सलाम देखील ठोकला.

आज अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या कामकाजासाठी जितेंद्र आव्हाड विधिमंडळात पोहोचले. यावेळी पत्रकारांनी त्यांना राज ठाकरेंनी महाकुंभातील स्नानाबद्दल केलेल्या विधानाबाबत विचारले. राज ठाकरेंनी महाकुंभावर विधान केले आहे. त्यांनी असे असे केले', असे म्हणत आव्हाड यांनी राज ठाकरेंप्रमाणेच बगला साफ करण्याची नक्कल केली. हे जर आम्ही केले असते ना, तर आतापर्यंत आमच्या घरावर मोर्चे आले असते. घरावर दगडफेक झाली असती. आम्ही देशद्रोहीदेखील ठरलो असतो, असे जितेंद्र आव्हाड म्हणाले.

जितेंद्र आव्हाड पुढे म्हणाले की, राज ठाकरेंनी त्यांचे मत व्यक्त केले. भारतात सगळ्यांना सगळी मत व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य आहे. किंबहुना मी राज ठाकरेंचे अभिनंदन करेन की, असे हिमतीने बोलणारा माणूस महाराष्ट्रात आहे. हे सगळे बोलायला हिंमत लागते. आपल्या मनातले बोलताना हिंमत लागते. आम्ही कद्रू झालो आहोत. आम्ही षंढ झालो आहोत. आम्ही बोलायला पण घाबरतो. राज ठाकरे त्यांच्या मनातले बिनधास्त बोलले आणि ते कित्येक भारतीयांच्या मनात आहे. त्यांच्या धाडसाला सलाम आहे. बाकी मला यावर काही बोलायचे नाही. राज ठाकरेंच्या धाडसाला सलाम इतकेच मी म्हणेन, अशा शब्दांत जितेंद्र आव्हाड यांनी राज ठाकरेंचे कौतुक करत त्यांच्या विधानाचे समर्थन केले आहे.

राज ठाकरे यांनी महाकुंभाविषयी बोलताना बाळा नांदगावकर यांचा अपमान तर केलाच आहे, सोबत अशाप्रकारचे वक्तव्य करुन त्यांनी तमाम स्त्रिया आणि हिंदू भाविकांचाही अपमान केला आहे. या विधानाकरिता राज ठाकरे यांनी कुंभला जाऊन जाहीर माफी मागितली पाहिजे. अशी टीका ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी केली.

राज ठाकरेंनी महाकुंभाविषयी केलेल्या विधानाबद्दल भाजप नेते नितेश राणे यांनीही त्यांच्यावर टीका केली आहे. प्रयागराजला जाऊन मी आणि माझ्या आईने स्नान केले, आम्हाला कसलाच त्रास जाणवला नाही. आमच्या आस्थेबाबत त्यांनी बोलू नये. असे ते म्हणाले

मुंबईत त्या दिवशी बैठक ठेवली होती. त्या बैठकीला शाखाध्यक्ष, उपाध्यक्ष आणि विभाग अध्यक्ष हजर झाले नाहीत. मग हजर झाले नाहीत त्यांची हजेरी घेतली. प्रत्येकाला कारण विचारलं. त्यातील पाच सहा जणांनी कुंभला गेला होतो सांगितलं. त्यांना म्हटलं मग गधड्यांनो पापं कशाला करता? आल्यावर आंघोळ केलीस का हेदेखील विचारले. आमचे बाळा नांदगावकर कमंडलूमधून पाणी घेऊन आले. मी म्हटले हड मी नाही पिणार. मी त्या सोशल मीडियावर व्हिडीओ पाहतोय तिथे आलेल्या बाया, पुरुष अंग घासतायत आणि बाळा नांदगावकर म्हणतात साहेब हे गंगेचे पाणी घ्या, कोण पिणार ते पाणी?,' असे म्हणत राज ठाकरेंनी महाकुंभातील स्नानाची खिल्ली उडवली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ११ मार्च २०२५


## संपुर्ण शेतकरी कर्जमाफी साठी स्वा. शेतकरी संघटनेचा रास्ता रोको




**कन्नड (अरुण थोरात) :** आश्वासनांची पुर्तता न करता सरकार शेतकऱ्यांची क्रुर चेष्टा करीत असल्याच्या निषेधार्थ व इतर मागण्यांसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटने च्या वतीने दि. १० मार्च रोजी आडगाव (पिशोर) ता.कन्नड येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. शेतकरी कर्जमाफी संदर्भात शासनाने चालु अर्थसंकल्पीय अधिवेशनात निर्णय घेण्याची मागणी करणारे निवेदन दि. ०४ मार्च रोजी तहसिलदार कन्नड यांना दिले होते.मात्र याकडे सरकारने दुर्लक्ष केल्यामुळे संघटनेच्या वतीने आडगाव (पिशोर) येथे आंदोलन केले. संपुर्ण शेतकरी कर्जमाफी बरोबरच शेतकरी कर्जाला सिबील ची अट लावू नये, पिक विमा, नमो किसान योजना व शेतकऱ्यांना अतिवृष्टी चे मिळालेले पैसे कर्जात जमा करु नये, बैंकानी शेतकऱ्यांवर दाखल केलेले फौजदारी गुन्हे मागे घेण्यात यावे, अंजनानदी व पुर्णानदी वर नदीजोड प्रकल्प राबवावा, अंजना पळशी प्रकल्पाची डावी व उजवी पाटचारी प्रत्येकी पाच पाच किमी. पुढे सरकविण्यात यावी, उजवी चारी सारोळा आमदाबाद मोहरा शिवारा पर्यंत तर डावी चारी नाचनवेल, आडगाव, पि.टाकळी नेण्यात यावी, अंजना पळशी प्रकल्पाच्या क्षेत्रातील गावांना पाणी देण्यात यावे नसता कमांड एरियातील नावे कमी करा, आदी मागण्या संघटने च्या वतीने करण्यात आल्या.या आंदोलनात संघटने चे प्रदेश कार्यकारणी सदस्य कृषीभुषण भाऊसाहेब थोरात, गणेश भोसले, राजेंद्र भोसले, नामदेव चिकणे, जगन जाधव, अमोल भोसले, भुजंगराव सुस्ते, सारंगधर सुस्ते, रमेश भोसले, सचिन सुस्ते, लक्ष्मण भोसले, सुभाष सुस्ते, रामदास भोसले, गणेश शिंदे, संजय पिंपळे, पठाण माजिद पठाण आर्दीसह शेकडो कार्यकर्ते, शेतकरी सहभागी झाले होते.

शेतकऱ्यांना भुल थापा देऊन हे सरकार सत्तेत आले परंतु आजच्या अर्थसंकल्पामध्ये कर्जमाफीचा कुठेही उल्लेख नाही याबद्दल स्वाभिमानी शेतकरी संघटना महायुती सरकारचा जाहीर निषेध करत आहे. या बजेटमध्ये कर्जमाफीचा उल्लेख करण्यात आलेला नाही. आज सादर करण्यात आलेले बजेट हे कार्पोरेट बजेट होते. एकेकाळी शेती व्यवसायात अग्रगण्य असणा-या राज्यात या बजेटमधून शेती व्यवसायाला बगल दिल्याने याचे दुरगामी परिणाम शेतकरी व शेतमजूरांना भोगावे लागणार आहे. सिंचन कर आकारणी स्थगिती दिले असल्याचे जलसंपदा मंत्री सांगत होते मात्र त्याबाबत कोणतीचे वक्तव्य वित्तमंत्री यांचेकडून करण्यात आलेले नाही. एकीकडे बड्या उद्योगपतींच्या अनेक मोठमोठ्या प्रकल्पाकरिता करामध्ये सवलती देण्यात आल्या आहेत व शेतक-यांना मात्र वा-यावर सोडण्यात आले आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## राज्यस्तरीय बसवरत्न पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे बसव प्रतिष्ठानचे आवाहन




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** क्रांतिसूर्य जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त प्रतिवर्षी बसव प्रतिष्ठान अखिल भारतीय सामाजिक संघटनेच्या वतीने राज्यातील विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा "राज्यस्तरीय बसवरत्न पुरस्कार" देऊन राज्ययील दिग्गज मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येते. सन्मानचिन्ह,सन्मानपत्र,शाल,फेटा असे पुरस्कार स्वरूप आहे. जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर जयंती उत्सव २०२५ निमित्त यंदाचा पुरस्कार सोहळाच ०९ वे वर्ष असून आतापर्यंत राज्यातील २४० व्यक्तींना संघटनेचा माध्यमातून सन्मानित करण्यात आला आहे. पुरस्काराने सामाजिक कार्याची प्रेरणा मिळावी, उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना ऊर्जा मिळावी ही उदात्त हेतू सामोरे ठेऊन बसव प्रतिष्ठानच्या वतीने धाराशिव जिल्ह्यातील उमरगा तालुक्यातील मुरूम येथे या सोहळ्याचे आयोजन केले जाते, सण २०२५ या वर्षात ३० एप्रिल रोजी म्हणजेच अक्षय तृतीया रोजी जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर जयंती सोहळा संपन्न होणार आहे, त्यानंतर मे २०२५ महिन्यात "राज्यस्तरीय बसवरत्न पुरस्कार" सोहळा संपन्न होणार असून या सोहळ्यात सामाजिक,राजकीय,शैक्षणिक, पत्रकार,क्रीडा,विधिज्ञ, शेतकरी, उद्योग, व्यापार, सहकार, संगीत, नृत्य, प्रशासकीय यासह विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीचा सन्मान गौरव सोहळा संपन्न होणार आहे व त्याच बरोबर ०५ व्यक्तींना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असून राज्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीने sasmramlingp@gmail.com किंवा www.basavpratishthanrp.com किंवा ७७७४८४९५७२ या व्हाट्सएप नंबर वर दि.०५ मे २०२५ पर्यंत प्रस्ताव पाठविण्याचे अवहान बसव प्रतिष्ठान अध्यक्ष डॉ.रामलिंग पुराणे यांनी केले आहे.

## लाडक्या बहिणींना २१०० रुपये कधीपासून मिळणार?

**मुंबई :** यंदाच्या अर्थसंकल्पात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा सन्माननिधी वाढवण्याबाबत कोणतीही घोषणा झाली नाही. त्यामुळे योजनेच्या पात्र महिलांना १५०० रुपये मिळणार आहेत. पण निवडणुकीआधी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे लाडक्या बहिणींना २१०० रुपये कधीपासून मिळणार? असा प्रश्न उपस्थित होत आहे. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिले आहे. आम्ही अर्थसंकल्पात जी आश्वासने दिली आहेत ती पूर्ण करणार, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणालेत. लाडकी बहीण योजनेचे पैसे कमी केलेले नाहीत. प्रत्येक पात्र महिलेला पैसे मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. योजनेचे पैसे वाढवण्याची गरज पडली तर जुलै, डिसेंबर महिना आहे, असेही फडणवीस म्हणाले.

विधानसभा निवडणुकीवेळी लाडक्या बहिणींचा सन्माननिधी १५०० रुपयांवरून २१०० रुपये करू, असे आश्वासन महायुतीकडून देण्यात आले होते. त्यानंतर विधानसभा निवडणुकीत महायुतीला घवघवीत यश मिळाले. महायुतीचे सरकार स्थापन झाल्यापासून लाडक्या बहिणींना २१०० रुपये कधी मिळणार? असे विचारले जात होते. तर याबाबत अर्थसंकल्पात निर्णय घेऊ असे, सत्ताधाऱ्यांकडून सांगण्यात आले होते. राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी महायुतीचे सरकार स्थापन झाल्यानंतर अर्थसंकल्पात २१०० रुपयांबद्दल घोषणा करण्यात येईल, असे सांगितले होते. पण, तशी घोषणा झाली नाही. १५०० रुपयेच मिळणार, हे अर्थसंकल्पानंतर स्पष्ट झाले. अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अर्थमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी एकत्रित पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी लाडक्या बहिणींच्या २१०० रुपयांबाबत प्रतिक्रिया दिली.

लाडकी बहीण योजनेचे पैसे कमी केलेले नाहीत. प्रत्येक पात्र महिलेला पैसे मिळणार आहेत. कुठलीही योजना तयार होते तेव्हा एक गृहितक धरले जाते, तीन कोटी, साडेतीन कोटी. त्या योजनेला अंतिम रुप येते तेव्हा जर ते गृहितक २ कोटी ७० लाख झाले तर तेवढे पैसे वाचतात ना? योजनेचे पैसे वाढवण्याची गरज पडली तर जुलै आहे, डिसेंबर महिना आहे. आवश्यक तेवढी तरतूद आपण यामध्ये ठेवली आहे. असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

लाडक्या बहिणींना २१०० रुपये कधीपासून मिळणार? असे विचारले असता, त्यासंदर्भात निश्चितपणे आमचे काम चालले आहे. एक लक्षात घ्या अर्थसंकल्पाचा समतोल राखणेही महत्त्वाचे आहे. घोषणा दिली आहे, तर ती पूर्ण करायची आहे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. सध्या ट्रेंड्स खूप चांगले चालले आहेत. योजना दीर्घकाळ चालवायची असेल तर आपल्याला त्यासाठी आर्थिक तरतुदीही करणे महत्वाचे असते. समतोल राखत पुढे जायचे आहे, त्यामुळे आम्ही अर्थसंकल्पात जी आश्वासने दिली आहेत ती पूर्ण करणार, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली. एप्रिल महिन्यात १५०० रुपयेच मिळणार. आम्ही २१०० रुपये कधी मिळणार ते घोषित करु. जेव्हा घोषित करु त्याच्या पुढच्या महिन्यांपासून २१०० रुपये महिलांना मिळण्यास सुरुवात होईल. असे उत्तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ११ मार्च २०२५


## कर्म. आ. मा. पाटील वरिष्ठ महाविद्यालयात स्नेहसंमेलनानिमित्त क्रिकेट स्पर्धेचे आयोजन



**पिंपळनेर :** कर्म आ मा पाटील कला, वाणिज्य आणि कै. आण्णासाहेब एन के पाटील विज्ञान वरीष्ठ महाविद्यालय पिंपळनेर वार्षिक स्नेहसंमेलन २०२४-२५ निमित्ताने क्रिकेट स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत महाविद्यालयातील विविध विभागातील तीन संघांनी सहभाग नोंदविला होता. स्पर्धेचे उदघाटन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. एल बी पवार यांनी केले.

स्नेहसंमेलन प्रमुख प्रा. डॉ. एस एस मस्के,आय क्यू ए सी समन्वय प्रा. डॉ. एस. पी. खोडके, प्रा. डॉ. एन बी सोनवणे, प्रा. डॉ. एस एन तोरवणे, प्रा. के एन वसावे, प्रा. एच एन वानखेडे, प्रा. बी एस वाघ आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी आपल्या उत्कृष्ट खेळाने सर्वांची मने जिंकली, प्रत्येक सामना चुरशीचा ठरला. अंतिम सामना संघ बी व संघ सी या संघात झाला, सामन्यात सुपर ओव्हर खेळून संघ सी ने बाजी मारली. स्पर्धेत द्वितीय वर्ष कलेचा विद्यार्थी रोशन दिलीप माळीच याने संघ सी चा कर्णधार म्हणून कामगिरी केली व उत्कृष्ट फलंदाजी व गोलंदाजी ने विजय मिळवून दिला व मॅन ऑफ द सिरीज ठरला.

प्राचार्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि खेळामुळे विद्यार्थ्यांमध्ये सांघिक भावना व नेतृत्वगुण विकसित होतात असे मत व्यक्त केले. यावेळी स्नेहसंमेलन प्रमुख प्रा. डॉ . सतीश मस्के यांनीही विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. प्रा. बी एस वाघ व प्रा. एच एन वानखेडे यांनी पंचाची भूमिका निभावली व स्पर्धेचे आयोजन केले.

# कन्नड-पिशोर रस्त्या वरील भीषण अपघातात सहा जण मृत्यूमुखी





**कन्नड (अरुण थोरात):** पिशोर-कन्नड रस्त्या वरील चंदननाला जवळील खांडीत उसतोडणी मजूरां सह ऊसाने भरलेला ट्रक उलटून झालेल्या अपघातात सहा जणांचा मृत्यू तर इतर जखमी झाल्याची दुर्घटना घडली आहे.दि.०९ मार्च रोजी रात्री बारा वाजेच्या सुमारास हा भिषण अपघात झाला. जी जे ११ टि व्ही ८३८६ क्रमांका च्या ऊसाने भरलेल्या ट्रक वरती १७ ऊसतोड मजुर बसून कन्नड कडे जात होते. हा ट्रक पलटी झाल्या मुळे त्या वरती बसलेले उसतोडणी मजूर त्या खाली दबल्या गेले, यात मिथुन महारु चव्हाण, किसन धर्मु राठोड, विनोद नामदेव चव्हाण, कृष्णा मुलचंद राठोड, राहुल चव्हाण, रा.सर्व सातकुंड (भट्टीतांडा), ज्ञानेश्वर देविदास चव्हाण रा.बेलखेडतांडा ता. कन्नड या तरुण मजुरांचा जागीच मृत्यू झाला तर, इंदलचंद प्रेमचंद चव्हाण रा. सातकुंड, इस्माईल अब्दुल जेडा रा. गुजरात, लखन छगन राठोड रा. सातकुंड, उमर मुसा भेडा रा.गुजरात, सचिन भागीनाथ राठोड रा. सातकुंड, राहुल नामदेव चव्हाण रा. सातकुंड, रविंद्र नामदेव राठोड रा. सातकुंड, सागर भागिनाथ राठोड रा.सातकुंड, आदी जखमी झाले. यातील बहुतांश उसतोडणी मजूर हे सातकुंड गावातील बंजारा समाजातील आहेत. या दुर्घटनेने सातकुंड व बेलखेडा गावावर शोककळा पसरली आहे. ऊसतोडणी हंगाम शेवटास आला आहे. बंजारा समाजात होळी सणास अतिशय महत्व असल्याने सणा वरती विरजन पडले आहे.

# आई सावित्री



आई सावित्री सावित्री  
नायगाव गं माहेर  
संसाराला ज्योतिबाच्या  
तुझा मोलाचा आधार ॥

होती नारी तू अज्ञानी  
अव्हेरली चिता भिंती  
भ्रताराच्या संगतीने  
पेटविल्या ज्ञान ज्योती ॥

भिडेवाड्यात पुण्याच्या  
रोज भरविली शाळा  
शिकवुनी लेकी बाळी  
तुच फुलवला मळा ॥

शेण,चिखल झेलता  
कधी मागे ना सरली  
रित्या नेत्रांत मुलींच्या  
स्वप्नं कैक जागविली ॥

आई सावित्री सावित्री  
तुच ज्ञानाची सरिता  
वटवृक्षाची सावली  
स्त्री शिक्षणाची माता ॥

**विजय बी. शिर्के**  
**सिल्लोड-9403634457.**

# विरक्त मठ येथे जागतिक महिला दिन विविध उपक्रमाने साजरा



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** केसरजवळगा, ता. उमरगा येथील विरक्त मठ येथे शिवरात्री निमित्ताने जागतिक महिला दिन शनिवार (ता. 8) रोजी विविध उपक्रमाने उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी सोलापूरच्या ब्रह्माकुमारी संस्थेच्या उपक्षेत्राचे प्रमुख ब्रह्माकुमारी राजयोगिनी सोमप्रभा दिदिजी होत्या. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विरक्त मठाधिपती श्री म. नी. प्र. विरंतेश्वर महास्वामीचे प्रवचन झाले. ब्रह्माकुमारी सोमप्रभा दीदी यांनी महाशिवरात्रीचे अध्यात्मिक रहस्य सांगत असताना उपवास व जागरण व शिव अवतरणाचे महत्त्व अत्यंत सुलभ व सहजरीत्या स्पष्ट केले. काम, क्रोध, लोभ, मोह अहंकार रुपी अवघड व्यक्तीने बाजूला काढले पाहिजेत. महास्वामीजीनी ब्रह्मा, विष्णू, शंकर यांचे महत्त्व सांगून सोमप्रभा दीदीच्या विचारांचे कौतुक करत सर्वांचे अत्यंत प्रेमभाव व सन्मानाने स्वागत केले. ब्रह्माकुमार राजूभाई भालकाटे यांनी सर्वांचे शब्द सुमनाने स्वागत केले.

यាप्रसंगी येरमाळा येथून आलेले ब्रह्माकुमार वैजनाथभाई यांनी मंच संचलन करून शिव परमात्म्याचा परिचय दिला.तसेच लोहारा येथील ब्रह्माकुमारी सरिता बहनजी व लक्ष्मी बहनजी यांची उपस्थिती होती. यावेळी सरपंच अमोल पटवारी, माजी सरपंच संगमेश्वर घाळे, माजी निवृत्त पोलिस उपनिरीक्षक कोरे आदींची विशेष उपस्थिती होती. गावासह खंडाळा गाव, भुरीकवठा, कदेर, दाळिंब, कवठा, मुरूम, येणेगुर, लोहारा या ठिकाणावरून भाई-बहीणी उपस्थित होत्या.प्रारंभी महास्वामी व सोमप्रभा दीदी यांच्या हस्ते ब्रह्माकुमारी पाठशाला येथे शिव ध्वजारोहण करण्यात आले. ब्रह्माकुमारी शिल्पा बहन यांनी आभार मानले.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ११ मार्च २०२५

# आंबेडकराईट जाणीवांच्या उन्मुक्त 'मनाच्या व्यथा': विद्रोही कवी साहेबराव



अस्मिता,प्रतिमा ह्या पुस्तकांच्या माध्यमातून व अनेक दिवाळी अंक, वृत्तपत्रीय लेखनातून साहित्यक्षेत्रात नोंद घेण्याजोगी भर टाकली आहे.अध्यापक असल्याने सामाजिक बदलांमुळे खोल रूतलेल्या वेदनांचे सहवेदन त्यांच्या लेखनात जाणवते.कवयित्री दलित सामान्य कुटुंबातून आल्या आहेत. गावगाड्यातील वर्णाधिष्ठित व्यवस्थेने एका विशिष्ट वर्गाला माणूस म्हणून नाकारले होते, अत्याचार कोसळणाऱ्या परिस्थितीत भोगलेल्या वेदनांचा आलेख "मनाच्या व्यथा" ह्या काव्यसंग्रहात आला आहे गावकुसाबाहेरील समाजाच्या वेदना,गाढवावर बिर्हाडं लादून पोटार्थ भटकंती करणारा समाज बांधव व सर्वहारा बहुजन समाजाच्या उन्नतीचा ध्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घेतला होता ,तेंव्हा स्वातंत्र्य लढ्यातील अग्रणी नेत्यांना बाबासाहेबांनी ठणकावून विचारले होते , "स्वातंत्र्य देशातील वंचित, शोषित, बहिष्कृत, उपेक्षित समाजाची मातृभूमी कोणती? समाजात त्यांचे नेमके स्थान कोणते? साठोत्तर पिढीने हे शोषण, बहिष्कृतपण अनुभवले.पिचलेल्या आयुष्याच्या जाणीवा अनेक कवी लेखकांनी प्रगल्भपणे मांडल्या, त्यापैकी पुष्पा साळवे एक होत.नारायण सुर्वे,दया पवार, नामदेव ढसाळ, त्र्यंबक सपकाळे, यशवंत मनोहर आदी तत्कालीन ज्येष्ठ लेखकांचा प्रभाव त्यांच्या लेखनात जाणवतो, तद्वतच आंबेडकरी विचारांचा परिवर्तनवादी विचारांचा द्रोह काव्यसंग्रहात मुख्यत्वेकरून नजरेत भरतो ."पण,ते रक्तातळलेले पंखहीमुठीत जीव घेऊन जगत होते ,विद्रोह पेटला होता. "(विद्रोह)स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही पारतंत्र्याच्या तटबंदी भिंतीतला विद्रोह कवयित्री व्यक्त करते.संग्रहात एकुण ५५ कविता असून 'मोबाईल, सैनिक, स्वातंत्र्य, स्त्रीमुक्ती, वृद्धाश्रम,आई, वडील, भाकरी,भूक, संविधान, शेतकरी,रमाई, क्रांतिसाऊ,म फुले, बाबासाहेब आंबेडकर - महापुरूषांचे,स्तवन, आदी वैविध्यपूर्ण विषयावरील कवितांचा अंतर्भाव कवयित्रीच्या व्यापक अनुभवातून आल्याचे अधोरेखित होते "फुले शाहू आंबेडकरांचागड, किल्ले, बुद्ध लेण्यांचाशिखरापरी पर्वत राजींचाखळखळणार्या सरीतांचा""महाराष्ट्र माझा "या कवितेत पुरोगामी महाराष्ट्राची ओळख करून दिली आहे 'स्वयंसिद्धा' ', मुलगी वाचवा मुलगी शिकवा' 'बाईपण,'सखी,'मुली, स्त्री तुझी कहाणी', ह्या कविता पुरुष प्रधानसंस्कृतिचे प्राबल्य अंकीत करणार्या आहेत., "स्त्री तुझी कहाणी" 'कवितेतील-"काळ बदलला,स्थित्यंतरे झाली पण, स्त्रीही अजून बंदीनी"साध्या सोप्या भाषेतून मार्मिक कथन हे वैशिष्ट्य मनात भरते."विधवेचं जीनं"कवितेतून विधवांच्या अनिष्ट रूढीवर प्रहार करतांनाच ज्वलंत प्रश्नही उपस्थित करतात,,"पुरुषाला स्वातंत्र्य पुनर्विवाह करण्याचा विधवेने पुनर्विवाह कां नाही करायचा "पुष्पा साळवे बुद्ध धम्माच्या करूणामयी संस्कार छायेत संस्कारीत असल्याने धम्मानुगामी कवितांमधून धम्माचरणाचा आग्रह धरतात,"त्या वटवृक्षात प्रज्ञेची पाने फुले बहरावीसुगंध पसवारा, बंधुता स्वातंत्र्याचा" भारताचे संविधान भारतीयांच्या आदर्श लोकशाही जीवनशैलीचा परिपाठ देते."न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता हा चतुसूत्रीचा नारा देऊनलोकशाहीच्या हरेक जीवांसाठी निर्मिले सामाजिक तत्वज्ञान "शांततेच्या निळ्या रंगाचं गारूड कवयित्रीच्या मनावर अधिराज्य गाजवते .याची साक्ष देणार्या "निळे वादळ" कवितेतील ओळी,"निळा रंग, समतेचा, परिवर्तनाचा.बुद्धांच्या शिकवणीचाधम्माच्या पावित्र्याचा."बाबासाहेबांच्या उंचीचे नेतृत्व समाजात नाही ही खंत पुष्पा साळवे "बाबासाहेब पुन्हा या" कवितेतून व्यक्त करतात "बाबासाहेब पुन्हा या मिळू द्या तुमची छत्रछाया तो आश्वासक आधारवड स्थिरावू द्या तुमच्या लेकरापाशी" अन्यायाविरुद्ध पेटून उठण्याची दाहकता प्रज्जवलित रहावी असं कवयित्रीला वाटतं,आज ती अग्रणी गरज आहे देश हळू हळू हुकुमशाहीकडे वाटचाल करीताहे त्या साठी संविधान वाचवायला हवे .,"घटनाकार "कवितेतून त्या ही अस्वस्थता व्यक्त करतांना लिहितात "भीमाची लेखणी बोलू लागलीतेव्हा हूकुमशाही,मूक झाली "या अर्थी एकुणात आंबेडकरी जाणीवांच्या उन्मुक्त मनाच्या व्यथा म्हणजे हा काव्यसंग्रह होय.सामाजिक संदर्भाच्या इतरही कवितांचा परामर्श घेणे अपरिहार्य ठरते"शिक्षक "कवितेत शाळाबाह्य कामाच्या विरोधात कोरडे ओढतात "जनगणना सर्वेक्षण मतदान नोंदणी आरोग्य संरक्षण शाळा बाह्य हाताळणी"जीवनात एकोपा असावाच असावा तू -तू करण्यात काहीच साध्य होणार नाही,"तुझं माझं करण्यात काही सारं नाही मनाचा मोठेपणा ठाईत्याची जीवनात हार नाही "राजकीय नेते स्वार्थासाठी लोकांची धर्माधर्मात विखारी वाटणी करून वणवा पेटवितात "कुठे दिसतो सर्वधर्म भावकुणी विचारतोय जातपात पण, काही समाजकंटक पेटलेल्या वणव्यात तेल ओतू पाहतात""आजकाल" कवितेतून आजची सामाजिक भीषणता परखडपणे मांडताना उद्विग्न होतात,"आजकालघराची दारं बंद करून आपल्याच घरात जो तोसुरक्षितता शोधू पाहतोय" "सध्याच्या बिकट काळातील विविध अनुभूतीच्या छटा पुष्पा साळवे यांच्या काव्यातून प्रामाणिकपणे, सहजपणे प्रकट झाल्या आहेत.त्याच्या संवेदनशील काव्यात्मतेला दाद द्यावी लागेल.डॉ श्रीपाल सबनीस यांच्या सूक्ष्म निरीक्षणातून आलेल्या प्रस्तावनेने काव्यसंग्रहांची साहित्यिक उंची वाढवली आहे.अथर्व पब्लिकेशन ने आकर्षक टाईप सेंटीग असलेला वर्चुअल संग्रह प्रकाशित केला आहे समाजातील उपेक्षित, वंचित घटकांच्या वेदना शब्दांकित करणारा ,मनाच्या व्यथा, हा काव्यसंग्रह रसिक वाचक व अभ्यासकांनीआवर्जुन वाचावा असे आवाहन करतो. . परिवर्तन चळवळीच्या दमदार साहित्यिक वाटचालीसाठी भगिनी पुष्पा साळवे यांना मंगलमय शुभेच्छा !!!

**समीक्षण: विद्रोही कवी साहेबराव मोरे**
**शब्दसंवाद: ९४०४०४८६०१**
**मनाच्या व्यथा: काव्यसंग्रह**
**कवयित्री : पुष्पा साळवे**
**प्रकाशन : अथर्व,**
**धुळे किंमत:१५०**

# जिल्हास्तरीय वरिष्ठ गट पुरुष व महिला व्हॉलिबॉल निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन



**छत्रपती संभाजीनगर** : महाराष्ट्र राज्य वरिष्ठ गट पुरुष व महिला हॉलीबॉल स्पर्धा राजीव गांधी स्टेडियम बेलापूर येथे दिनांक २१ / ३ / २०२५ ते २३/ ३ / २०२५ या दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या आहेत या स्पर्धेसाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा संघ निवडण्यासाठी निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन दिनांक १६ मार्च रोजी यशवंतराव चव्हाण हायस्कूल सिडको एन -६या ठिकाणी सकाळी ठिक दहा वाजता आयोजित करण्यात आलेली आहे.

निवड झालेल्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या पुरुष व महिला संघांना याच ठिकाणी आयोजित विभागीय हॉलीबॉल स्पर्धेत भाग घ्यावा लागेल.

राज्य स्तरावर होणाऱ्या राज्यस्तरीय वरिष्ठ गट पुरुष व महिला स्पर्धेसाठी विभागातून पुरुषाचे प्रथम व द्वितीय संघ तसेच महिलांचा विजय संघ पाठवण्यात येईल या विभागीय स्पर्धेसाठी छत्रपती संभाजीनगर जालना परभणी व हिंगोली या जिल्ह्याचे वरिष्ठ गट पुरुष व महिला संघ भाग घेणार आहेत या विभागीय स्पर्धाही यशवंतराव चव्हाण हायस्कूल सिडको एन -६याच ठिकाणी दिनांक १६ मार्च २०२५ रोजीआयोजित करण्यात आलेल्या आहेत . तरी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वरिष्ठ गट पुरुष व महिला यांनी जिल्हास्तरीय संघाच्या निवडीसाठी उपस्थित राहावे निवडला संघ विभागीय स्पर्धेसाठी याच ठिकाणी खेळेल जिल्हास्तरीय निवड चाचणी स्पर्धा व विभागीय हॉलीबॉल स्पर्धेसाठी जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग नोंदवावा.

जिल्हास्तरीय निवड चाचणी स्पर्धा व विभागीय हॉलीबॉल स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विभागीय हॉलीबॉल सचिव श्री सतीश पाठक सय्यद रफत उमेश शिंदे अर्षद काजी नवेद पठाण प्रवीण शिंदे लुकमन बागवान अभिजित दिख्खत . अक्रम काजी रोहित पाटील नारायण शिंदे सोमनाथ पच लूरे .सोमनाथ टाक .सौ ज्योती दांडगे . प्रफुल्ल कुलकर्णी . विलास राजपूत .गणपत पवार . आशिष शुक्ला . जब्बार पठाण व आसिफ पठाणहे मेहनत घेत आहेत .